पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **२०/०७/२०२१** वेळ - **सकाळी ११.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **२०/०७/२०२१** रोजी **सकाळी ११.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील मा.सभापती, शिक्षण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य मा.सभापती यांचे दालनात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.तुषार रघुनाथ हिंगे
४. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
५. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे - प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) सन २०२१-२२ साठी प्राथमिक विभागातील बालवाडी ते ८ वी व माध्यमिक विभागातील ५ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांना २ विद्यर्थी शालेय गणवेश, २ पी.टी.गणवेश व १ स्वेटर त्वरीत वाटप करणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विभागातील बालवाडी व इ१ ली ते १० वी तील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ सर्व माध्यमांसाठी अभ्यासक्रमासहित टॅब थेट पध्दतीने खरेदी करणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ३ री ते ७ वी तील विद्यार्थ्यांना सुंदर हस्ताक्षर करिता मायमराठी अक्षर लेखन प्रकल्प हे पुस्तक थेट पध्दतीने खरेदी करणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये (गुडफील) जे.एस.आर.इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि. यांचे शालेय विद्यार्थ्यांकरीता बायोसेफ्टी बाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी शालेय वह्यांचे वाटप करणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयामध्ये विद्यार्थी व शिक्षकांकरीता आवांतर वाचनासाठी पुस्तके खरेदी करणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील बालवाडी व इ.१ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांकरीता शालेय साहित्य खरेदी करणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत कोरोना विषाणू विनाश करणारे UVC सयंत्र बसविणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील कार्यरत कायम पर्यवेक्षक वर्ग-३ पदास फिरती भत्ता लागू करणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्वयंअर्थसहाय्यीत इंग्रजी माध्यमांच्या शाळांवर नियंत्रणासाठी स्वतंत्र पर्यवेक्षक नेमणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी विविध साहित्य दप्तरे, स्पोर्टशुज, वॉटरबॉटल, कंपासपेटी व लेखनपॅड खरेदी करणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरीता शालेय शैक्षणिक साहित्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी मा.शिक्षण समितीची मान्यता घेणेबाबत - मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०१/०७/२०२१, १५/०७/२०२१ व १६/०७/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०९) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४१ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २०/०७/२०२१
सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.स्वाती काटे
संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मन.पा. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थांना वाटप करण्यात येणाऱ्या शालेय विद्यार्थी गणवेश, पि.टी.गणवेश व स्वेटर पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकाच्या विरोधात म.न.पा.उच्च न्यायालयात गेली असता न्यायालयाने निविदा अटी-शर्ती व पुरवठाधारकाबरोबर केलेला करारनामा ह्या सर्व कागदपत्रांची पाहणी केली व सर्व कागदपत्रे हि योग्य असल्याचे पाहून सदरचा निकाल पुरावठाधाराकाच्या बाजूने दिला आहे तसेच मा.दिवाणी न्यायालय पुणे यांच्या अंतरिम आदेशास अधिन राहून कार्यवाही करावी असे नमूद केले आहे व कायदेशीर बाबींची पडताळणी करून न्यायालयाने वादी यांचा मनाई अर्ज मंजूर केलेला आहे. त्यानुसार मा.दिवाणी न्यायालयाने सदर दाव्यावर Intereme Injuction अन्वये पूर्वीच्या करारनाम्यानुसार कार्यवाही करणेबाबत न्यायालयाचे आदेश झाले आहेत. करारनाम्यातील नमूद कालावधी नऊ वर्ष करीता पुरवठाधारक मान्य निविदा दरानेच पुरवठा करण्यास तयार असल्याने सध्याचे वाढलेल्या बाजारभावाचा विचार करता निविदा मान्य दरानेच उत्कृष्ट दर्जाचा पुरवठा गेली ५ वर्ष प्राप्त होत असलेल्या पुरवठ्याचा विचार करता, सदर बाब हि पिंपरी चिंचवड म.न.पा.चे आर्थिक हिताची आहे. तसेच पुरावठाधारकाने पुरवठा साहित्य सन २०२१-२२ करीता पुरवठा करणेस उपलब्ध असलेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार साहित्य तयार असलेबाबतची खात्री समितीने केलेली आहे. सन २०२०-२१ मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल दिनांक १८/०१/२१ रोजी पुरवठाधारकांचे बाजूने लागला असता व विद्यार्थ्यांना २ विद्यार्थी शालेय गणवेश, २ पि.टी.गणवेश व १ स्वेटर वाटपाचे कामकाज सन २०२०-२१ मध्ये त्वरित पूर्ण करून घ्यावे. असे निर्देश उच्च न्यायालयाने पिंपरी चिंचवड मन.पा. माजी आयुक्त यांना दिले होते. तरी सदर साहित्य वाटपाचे आदेश प्रशासनाने कोणाच्यातरी दबावाखाली येऊन स्वतःच्या सोयीनुसार उशिरा कालावाधीनंतर पुरवठा वाटप आदेश दिनांक १५ मार्च २१ रोजी देण्यात आले. यामध्येही गोरगरीब विद्यार्थ्यांना साहित्य देण्यास प्रशासनामार्फत दिरंगाई करण्यात आली. प्रशासनाने हे वेळोवेळी लक्षात ठेवले पाहिजे की शहरातील गोरगरीब विद्यार्थ्यांना म.न.पा. शाळेत शिकत असतात. मागिल वर्षापासून कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांचा रोजगार बंद झाला आहे. त्या गरीब पालकांकडे स्वतःच्या मुलांसाठी नव्याने कपडे घेण्यासाठी पैसे नाही आणि अशातच शिक्षण समितीने ठराव क्रमांक ६२ नुसार सूचना देऊनही दिवाणी न्यायालयाच्या निकाला विरोधात म.न.पा.ने उच्च न्यायालयात अपिल न करता पुरवठाधारका सोबत निविदा अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या करारनाम्यानुसार नमूद मुदत कालावधीप्रमाने सन २०२०-२१ चे शालेय विद्यार्थी गणवेश,पि.टी.गणवेश व स्वेटर विद्यार्थ्यांना त्वरित वाटप करण्यात यावे. तसेच मा.शिक्षण समिती ठराव क्र. ६२ नुसार कार्यवाही करण्याबाबतचे आदेश मा.न्यायालयाने दिले होते तरीही प्रशासनाने पुरवठा वाटप आदेश देते वेळी सदर ठरावानुसार प्रशासनाने कारवाई न करता

कोणाच्यातरी दबावात येऊन प्रशासनाने विद्यार्थ्यांचे हित बघण्यापेक्षा पुरवठाधारकांच्या विरोधात उच्च न्यायालयात अपिल केले व त्याचाही निकाल पुरवठाधारकांच्या बाजूने लागला. या सर्व घडामोडींमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील गोरगरीब विद्यार्थी, शालेय गणवेश, पि.टी. गणवेश व स्वेटर पासून वंचित राहिले. मा.शिक्षण समिती व प्रशासन यांनी दिनांक - ०३/०६/२०२० रोजी निविदा अटी-शर्ती व करारनाम्यानुसार शालेय विद्यार्थी गणवेश, पि.टी.गणवेश व स्वेटर म.न.पा.च्या ताब्यात घेतले असताना व सन २०२०-२१ मध्ये शैक्षणिक वर्ष सुरु झालेपासून शाळेंमध्ये विद्यार्थांना शालेय पोषण अंतर्गत दरमहा विद्यार्थांना अन्नधान्य वाटप होत असताना सुद्धा दिनांक १५ मार्च २०२१ रोजी वाटपाचे आदेश देऊन सन २०२०-२१ ला शालेय गणवेश, पि.टी.गणवेश व स्वेटर वाटप उशिरा करण्यात आले. सदरचे शालेय विद्यार्थी गणवेश,पि.टी.गणवेश व स्वेटर यावर शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ चा महापालिकेचे मोनोग्राम व त्यावर सन २०२०-२१ चा उल्लेख आहे. प्रशासनाने केलेल्या दिरंगाईमुळे सदरचे साहित्य उशिरा वाटप करण्यात आले. मा.न्यायालयाचा अवमान होईल हे लक्षात न घेता सन २०२०-२१ च्या आदेशामध्ये प्रशासनाने सन २०२१-२२ च्या वापराकरिता असे नमूद केले असून यामध्ये मा.न्यायालयाचा अवमान होत आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील गोरगरीब पालकांच्या विद्यार्थ्यांना दोष देणे योग्य नाही. तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नव्याने चालू झाल्याने पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या प्रथेनुसार शहरातील गोरगरीब पालकांच्या प्राथमिक विभागातील बालवाडी ते ८ वी व माध्यमिक विभागातील ५ वी ते १० वी तील सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पि.टी.गणवेश व स्वेटर म.न.पा. शाळेतील विद्यार्थी संख्या आकडा पट वही, मूळ पटानुसार दरवर्षी प्रमाणे शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ साठी शालेय विद्यार्थी गणवेश, पि.टी.गणवेश व स्वेटर नव्याने वाटप करण्यात यावेत. सदरचा खर्च प्राथमिक विभागातील लेखाशिर्ष, विद्यार्थी शालेय गणवेश, बालवाडी गणवेश, खेळ शाळा गणवेश, विद्यार्थी स्वेटर व बालवाडी स्वेटर यावरून खर्च करण्यात यावा. तसेच प्रशासनाने स्व:ताच्या सोयीनुसार निर्णय न घेता शहरातील गोरगरीब विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन त्यांची शालेय विद्यार्थी गणवेश, पि.टी.गणवेश व स्वेटर साहित्यापासून गैरसोय होणार नाही व शिक्षणाबद्दल गोडी वाढावी याद्दष्टीने सदरचे साहित्य शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ साठी नव्याने वाटप करण्यात यावेत. तसेच भविष्यात न्यायालयीन प्रक्रिये मध्ये वेळ वाया न घालवता विद्यार्थ्यांच्या हितासाठी म.न.पा.ने पुरवठाधारकाचा दावा मान्य करून सदरचा दावा संपुष्टात आणावा व शहरातील गोरगरीब विद्यार्थांना त्याच्या हक्काचे शालेय विद्यार्थी गणवेश, पि.टी.गणवेश व स्वेटर सन २०२१-२०२२ या शिक्षणिक वर्षातील त्वरीत वाटपाची कार्यवाही यापूर्वीच्या निविदा अटी व शर्तीनुसार केलेल्या करारनामा प्रमाणे व यापूर्वीच करारनाम्यातील नमूद संपूर्ण कालावधिकरीता दिलेल्या पुरवठा आदेशानुसार नव्याने निविदा न मागवता श्री.महालक्ष्मी ड्रेसेस अँन्ड टेलरिंग फर्म यांचेकडून बालवाडी ते ८ वी साठी २ शालेय विद्यार्थी गणवेश, प्रेस्टीज गारमेंट्स अँन्ड टेलरिंग फर्म यांचेकडून बालवाडी ते ८ वी साठी २ पि.टी. गणवेश व श्री वैष्णवी महिला कॉर्पोरेशन यांचेकडून बालवाडी ते ८ वी साठी १ विद्यार्थी स्वेटर तसेच माध्यमिक विभागातील ५ वी ते १० वी तील सर्व विद्यार्थ्यांना २ शालेय विद्यार्थी गणवेश, २ पि.टी.गणवेश व १ स्वेटर यांना सन २०२१-२२ साठी, वाटप करणे साठी वाटप पुरवठा आदेश देण्यात यावे. तसेच वरील कामासाठी निधी कमी पडल्यास सन २०२१-२०२२ सुधारीत अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात यावी व त्या पूर्वीच

विद्यार्थ्यांना २ शालेय विद्यार्थी गणवेश, २ पि.टी.गणवेश व १ स्वेटर प्राथमिक व माध्यमिक विभागातील बालवाडी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना त्वरीत वाटप करण्यात यावे. सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत असून ठराव कायम होणेची वाट न पाहता शाळा सुरु झालेने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची तत्परता लक्षात घेता मा.प्रशासन अधिकारी व मा.शिक्षणाधिकारी यांनी मा.शिक्षण समिती यांचा मंजूर धोरणात्मक ठरावानुसार त्वरित मा.आयुक्त याचे मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्यात यावा. तसेच वित्तीय खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गोरगरीब परिस्थितीतून झोपडपट्टीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थी म.न.पा. शाळेत प्रवेश घेण्यासाठी व त्यांना मोफत शिक्षण व साहित्य मिळणेसाठी तसेच म.न.पा.शाळेतील विद्यार्थीमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या म.न.पा.शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. शहरातील अनेक खाजगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोबाईलवर ऑनलाईन पद्धतीने शिक्षण दिले जात आहे. त्याचप्रमाणे आपल्या सर्व म.न.पा.शाळेतील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिक्षण देणेत यावे परंतु काही पालकांची आर्थिक परिस्थिती खूपच हालाकीची असल्याने ते त्यांच्या पाल्यास मोबाईल खरेदी करून देऊ शकत नाही. त्यामुळे सदर विद्यार्थी हा शिक्षणापासून वंचित राहत आहे. म.न.पा.शाळेतील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये यासाठी म.न.पा.शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. मागिल वर्षी सुद्धा कोरोना प्रादुर्भावामुळे शाळा बंद होत्या व त्यामुळेही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न भरून निघणारे झाल्याने तसेच यावर्षी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ सुरू होऊन एक महिना झाला असून त्याबाबत कोणतीही कार्यवाही प्राथमिक शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेली नाही. किमान या वर्षी तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी निविदा न राबवता Tab With Education Contain त्वरित थेट पद्धतीने केंद्रशासनाच्या PSU संस्था Broadcast Engineering Consultants India Limited (BECIL) कंपनी मार्फत त्वरित खरेदी करण्यात यावे. तसेच माध्यमिक विभागाने मागील मा.शिक्षण समिती व मा.स्थायी समिती यांच्या थेट टॅब खरेदी मान्य ठरावानुसार माध्यमिक विभागांने Broadcast Engineering Consultants India Limited (BECIL) मार्फत खरेदी करण्यासाठी यापूर्वीच विचारणा केली असल्याने त्या कार्यवाहीस अधिन राहून विद्यार्थ्यांना Tab With Education Contain त्वरित प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागातील सर्व विद्यार्थांना टॅब खरेदी करण्यात यावेत .तसेच यापूर्वी

मा.शिक्षण समितीने टॅब खरेदी कार्यपद्धती थेट पद्धतीने अवलंबावी या धोरणात्मक विषयाकरिता ठराव क्रमांक:१७ दिनांक ०७/०१/२०२१ नुसार मान्यता दिली आहे व मा. शिक्षण समितीच्या धोरणात्मक ठरावास मा.स्थायी समितीनेही थेट पद्धतीने खरेदी करणेसाठी तसेच त्यास वित्तीय मान्यता ठराव क्रमांक :८१८९ दिनांक १९/०१/२०२१ प्रमाणे मान्यता दिली असून त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यासाठी निविदा न राबवता थेट पद्धतीने टॅब खरेदी करणेस मान्यता देण्यात येत आहे. तरी सदरची खरेदी थेट पद्धतीने Tab With Education Contain राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने सन २०२१-२२ ची मान्यता असलेले बालवाडी व पहिली ते आठवी प्राथमिक विभागासाठी व पाचवी ते दहावी माध्यमिक विभागासाठी अभ्यासक्रम टॅब सहीत तसेच शिक्षकांनाही टॅब देण्यात यावे जेणेकरून विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी सुलभ जावे व वेळोवेळी शिक्षकांना छोट्यामोठ्या कामासाठी महानगरपालिका कार्यालयामध्ये शिक्षणाबाबतच्या व प्रशासकीय कामकाजासाठी विद्यार्थ्यांचे शिक्षण सोडून जावे लागते त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते सदर कारणे व त्यामुळे होणारे विद्यार्थ्यांचे नुकसान हे टाळण्यासाठी शिक्षकांनाही टॅब देण्यात यावेत. तसेच सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना टॅब ची माहिती व वापरण्याचे ट्रेनिंगही केंद्रशासनाच्या PSU संस्था Broadcast Engineering Consultants India Limited (BECIL) कंपनी मार्फत देण्यात यावे. तसेच कंपनीचे पिंपरी चिंचवड म.न.पा.कार्यालयाजवळ जवळ ट्रेनिंग सेंटर असावे जेणेकरून शाळेतील शिक्षक विद्यार्थी यांचेसाठी टॅब संबंधित शैक्षणिक सुविधा पुरविण्यात येतील. त्यासाठी Tab with Education Contain खरेदी करण्यात यावेत. व त्याचेबरोबर पाच वर्षासाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्च करार (Annual Maintenance Contract) करण्यास केंद्रशासनाच्या PSU संस्था Broadcast Engineering Consultants India Limited (BECIL) मार्फत खरेदी व करार त्वरित करण्यात यावा सदरचा संपूर्ण विषय धोरणात्मक असून यास मान्यता देण्यात येत आहे व सदरच्या कामाकरिता होणारा खर्च प्राथमिक शिक्षण विभागाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील " ई लर्निंग स्कूल" या लेखाशीर्ष व माध्यमिक शिक्षण विभागाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील " विविध उपक्रम" या लेखाशिर्षातून करण्यात यावा. तसेच सदर योजना पूर्ण करणेकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी सदरचा निधी इतर विभागातील अखर्चित रक्कमेतून उपलब्ध करण्यात यावा. अथवा सन २०२१-२२ मधील सुधारित अंदाजपत्रकामध्ये तरतूद उपलब्ध करून देण्याची मान्यता देण्यात येत आहे. सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत असून ठराव कायम होणेची वाट न पाहता शाळा सुरु झालेने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची तत्परता लक्षात घेता मा.प्रशासन अधिकारी व मा.शिक्षणाधिकारी यांनी मा.शिक्षण समिती यांचा मंजूर धोरणात्मक ठरावानुसार त्वरित मा.आयुक्त याचे मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्यात यावा. तसेच वित्तीय खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थीचे हस्ताक्षर सुंदर होणेकरिता "मे.मोरया होलसेल स्टेशनरी कंपनी" यांच्यामार्फत मायमराठी अक्षर लेखन प्रकल्प हे पुस्तक खरेदी करणेबाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ. ३ री ते इ. ७ वी तील विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता "मे.मोरया होलसेल स्टेशनरी कंपनी" यांच्यामार्फत मायमराठी अक्षर लेखन प्रकल्प हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपुर्ण देशामध्ये असलेने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे सद्यस्थितीमध्ये सर्व प्राथमिक शाळा बंद आहेत व शालेय शिक्षण ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत. सदरचे काळामध्ये शालेय विद्यार्थानीकरिता (गुडफिल) जे.एस.आर.इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि.पिंपरी यांनी कोरोना संसर्गापासून बचाव होण्यासाठी नॉन मेडीसिनल प्रिव्हेंटीव्ह मेजर म्हणून स्टॅण्ड अँण्ड पी अंडरगारमेंटची निर्मीती महिला व शालेय विद्यार्थांकरीता दररोजचे वापराकरीता केलेली आहे. (गुडफिल) जे.एस.आर.इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि. या कंपनीचे उत्पादनास जगातील ७५ देशांमध्ये पेटंट असुन या उत्पादनाची विक्री केले जात आहे. गुडफिल उत्पादनाचा उपयोग हा शालेय विद्यार्थांनीना कोरोना काळामध्ये शाळा बंद असल्या तरी त्यांचे घरी राहून अथवा बाहेर असल्यासही त्यापासून संरक्षण मिळणार आहे. (गुडफिल) जे.एस.आर.इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि.यांचे गुडफिल उत्पादन हे शालेय विद्यार्थांनीकरीता अतिशय उपयुक्त असलेने सर्व प्राथमिक व माध्यमिक विद्यालयांमधील सर्व शालेय विद्यार्थांनीन करीता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये या कीटचे वाटप करणेत यावे, गुडफिल कीटमध्ये १ अंडरगारमेंट व २ डबललेअर मास्कचा समावेश असणार आहे. सदरचे कीट हे १ वर्षाचे वॉरंटीसह येत आहे व हे उत्पादन दैनंदिन वापरासाठी योग्य आहे. गुडफिल प्रति कीटची किंमत र.रु.१७९९/-

अशी असुन गुडफिल यांचेमार्फत सवलतीच्या दरामध्ये हे कीट किंमत र.रू.१५९९/- प्रति विद्यार्थीनी २ कीट नुसार महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. महानगरपालिका माध्यमिक व प्राथमिक शाळांमध्ये अंदाजे २५००० विद्यार्थांनीना या कीटचा उपयोग होणार आहे. तरी कोरोना काळामध्ये शालेय विद्यार्थांनीकरीता (गुडफिल) जे.एस.आर.इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि.पिंपरी यांनी कोरोना संसर्गापासून व बायोसेफ्टी होण्यासाठी शालेय विद्यार्थांनाना उपयोगी कीटचे वाटप करणेकामी शिक्षण समितीची मान्यता देणेत येत आहे. यासाठी प्रशासानामार्फत योग्य ती कार्यवाही करणेत येवून शालेय विद्यार्थांनीना गुडफिल कीट वाटप करणेकामी पुढील योग्य ती कार्यवाही करणेत यावी. शिक्षण विभागाकडील सन २०२१-२०२२ या वर्षातील उपलब्ध शिल्लक तरतूदीमधून खर्च करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४५ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपुर्ण देशामध्ये असलेने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे सद्यस्थितीमध्ये सर्व प्राथमिक शाळा बंद आहेत व शालेय शिक्षण ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत. सदरचे काळामध्ये विद्यार्थांना शालेय साहित्य देणे आवश्यक असल्याने तथापि नजीकचे काळामध्ये प्राथमिक शाळा ऑनलाईन सुरु असल्याचे शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य गतवर्षाचे पुरवठाधारक यांचेकडून गतवर्षाचे दराने शैक्षणिक साहित्य शालेय वह्यांचे वाटप करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये कोरोना साथरोगामुळे शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी साहित्यांची आवश्यकता असलेने शालेय साहित्य वाटपाकामी इ.१ ली ते ८ वी मधील सर्व शालेय विद्यार्थांकरीता शालेय वह्या चे पुरवठाधारक मे.सनराज प्रिंटपॅक इंडस्ट्रीज यांचेमार्फत मागील दरानेच शालेय वह्यांचा पुरवठा करणेकामी मान्यता देणेकामी योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. शिक्षण विभागाकडील सन २०२१-२०२२ या वर्षातील शालेय वह्या या तरतूदीमधुन येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम्म होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४६ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयामध्ये विद्यार्थी व शिक्षकांकरिता वाचण्याकरिता पुस्तके खरेदी करणेबाबत मे.साहित्यदर्शन, पुणे यांनी प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. सदर संस्थेमार्फत गेली अनेक वर्ष महाराष्ट्रातील नामवंत प्रकाशन संस्थांची चरित्र, आत्मचरित्र, ऐतिहासिक, विज्ञान, पर्यावरण, संगणक, आरोग्य, धार्मिक, स्पर्धा परीक्षा, बालकुमारवाडमय, कथा कादंबऱ्या इत्यादी विषयांची पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच सदरची पुस्तके मे.साहित्यदर्शन, पुणे यांनी शासकीय, निमशासकीय, शैक्षणिक संस्था, स्वायत संस्था, जिल्हा परिषद, शासनमान्य ग्रंथालय, महानगरपालिका, नगरपालिका यांना पुरवठा करीत आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयांमध्ये १२० पुस्तके पुरवठा करण्याचे व सदर कामास र.रु.४,९६,८००/- खर्च कळविला आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विद्यार्थी व शिक्षकांकरिता अवांतर वाचनासाठी "मे.साहित्यदर्शन, पुणे" यांच्यामार्फत पुस्तके थेट पद्धतीने खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४७ विषय क्रमांक - ०७

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपूर्ण देशामध्ये असल्याने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावाने सद्यस्थितीत सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा बंद आहेत.सद्य स्थितीत कोरोना प्रादुर्भावामुळे ऑनलाईन शिक्षण चालू आहे त्यासाठी विद्यार्थांना शालेय उपयोगी आवश्यक शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी शाळांनी मागणी केलेली आहे. तथापि नजिकच्या काळामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु होणार असल्याने शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी साहित्य नव्याने निविदा न मागविता उपरोक्त नमूद केलेल्या मागील पुरवठादाराकडून सदरचे साहित्य त्यात कोणत्याही प्रकारची दरवाढ न करता मागील वर्षाच्या मंजूर लघुत्तम दराने सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता बालवाडी व इ.१ ली ते १० वी च्या विद्यार्थांकारिता शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास मान्यता देण्यात यावी.प्रस्तुत प्रकरणी मागील प्रसिध्द केलेल्या निविदा क्र.५/१ ते ५/१० मधील निविदा क्र.५/१, ५/२, ५/३ निविदा व करारनाम्यातील शर्ती अटी निविदा क्र. ५/८ व ५/९ लागू करण्यात आल्या होत्या व आहेत. त्या अनुषंगाने सदर खरेदीस मान्यता देण्यात यावी. तरी अद्याप कोरोना

सांसर्गिक रोगाचे प्रादुर्भावामुळे शाळा बंद आहेत. दि. १ ऑगस्ट २०२१ रोजी शाळा सुरु होणार असल्याचे प्रस्तावित आहे. शालेय विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व विद्यार्थांना वेळेत साहित्य मिळावे यासाठी विद्यार्थाना शालेय वस्तूंचे वाटप करणे आवश्यक आहे. तरी प्रशासनाकडून त्वरित कार्यवाही करण्यात यावी. मूळ निविदेतील सर्व साहित्य इ. १ ली ते ८ वी च्या अंदाजे ४९ हजार विद्यार्थांकरिता शालेय प्रयोगवही, चित्रकलावही, भूगोलनकाशावही, लेखाशीर्ष सर्वांगिक शैक्षणिक गुणवत्ता व विकास वरून तसेच बालवाडी व इ. १ ली ते ७ वी विविध अभ्यासपूरक पुस्तके व इ. बालवाडीची पुस्तके हि इ. १ ली व २ री च्या विद्यार्थांना अधिकची पुस्तके बालवाडीच्या पुस्तकाच्या मंजूर दराने व्यवसायमाला व स्वाध्यायमाला या लेखाशिर्षावरून खरेदी करण्यास व मूळ निविदेतील मान्य दराने माध्यमिक विद्यालयातील इ. ५ वी ते १० वी च्या अंदाजे ८८०० विद्यार्थांकारिता चित्रकलावही, प्रयोगवही,भूगोलनकाशावही व विविध अभ्यासपूरक पुस्तके हि विविध उपक्रम या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतूद मधून तसेच प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील इ.५ वी ते १० वी च्या विद्यार्थांना आलेखवही, विविध अभ्यासपूरक पुस्तके निविदेतील गृहपाठमाला इ.५ वी ते ७ वी च्या गृहपाठमालेच्या पुस्तकाच्या दरात उपलब्ध तरतूदीमधून पुरवठाधारक मे.कौसल्या पब्लिकेशन मार्फत शाळानिहाय शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी नव्याने करारनामा करून पुरवठा आदेश देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८ विषय क्रमांक - ०८

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत कोरोना विषाणू विनाश करणारे UVC सयंत्र बसविणेबाबत. या मशीनमध्ये UVC SCANZ हे संयंत्र अल्ट्रावायलेट सी बॅंड ची प्रखर किरणे उत्सर्ग करून कोणत्याही प्रकारचे जिवाणू बॅक्टेरिया वायरस कोरोना प्रकारचे विषाणू त्याच्या DNA वर परिणाम करून संपूर्ण ९९.९९% विनाश करते. UVC स्कॅनिंग हे संयंत्र पूर्णपणे भारत देशात विकसित केलेले आहे. तसेच त्याची संपूर्ण निर्मिती सेफ लायफस कंपनी (युरोटेक ग्रुप ऑफ कंपनीचा उपविभाग) चा हैदराबाद येथील यांत्रिकी कारखान्यात तयार केले जाते. UVC स्कॅनिंग हे संयंत्र आपणास परिचित अशा एक्स-रे मशीन सारखे काम करते विविध वस्तू, पिशव्या, लॅपटॉप बॅग, डायरी आणि इतर सामान ह्या यंत्रणाच्या पट्ट्यावरून संयंत्रात प्रवेश करून वीस ते तीस सेकंदात बाहेर पडते. त्यावर UVC किरणांचा वर्षाव होऊन वस्तू/सामान ९९.९९% कोरोना मुक्त होऊन बाहेर येते. हे संयंत्र बाहेरून सामान घेऊन आलेल्या व्यक्तीचे सामान संयंत्रातून प्रसार करून कोरोना सारखे संसग्रजन्य रोगाचे विषाणू मुक्त सहज करता येते आणि संपूर्ण वास्तू कोरोना नियंत्रित करता येते. या UVC स्कॅनिंग यंत्रासोबत व्यक्तीची शारीरिक तापमान मोजण्याची व्यवस्था आहे. तसेच कर्मचाऱ्यांची येण्याची वेळ आणि त्यांचे तापमान हे आम्ही क्लाऊड ला जमा करून आपल्या जबाबदार विभागाकडे त्याची नोंद देतो यामुळे

कर्मचाऱ्यांचे हजेरी पत्रक देखील तयार होते. युरोप, ब्रिटनमध्ये नवीन कोरोनाच्या भीतीने संपूर्ण जग हादरले आहे. कोरोनाचा नवीन प्रकार जगात पुन्हा उद्भवला तर भविष्यात कोणत्याही जैविक संक्रमणासाठी उपभोगात येईल असे UVC SCANZ मशीन विविध ठिकाणी बसवून जनतेचे सार्वजनिक ठिकाणी व्हायरसचे होणारे संक्रमण नक्कीच रोखू शकतो. सध्या पिंपरी चिंचवड मध्ये नवीन कोरोनाचे ३ रुग्ण मिळाले असून भविष्यातील येणाऱ्या संसर्गाला काही प्रमाणात रोखण्यासाठी या मशीनचा नक्कीच उपयोग होईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत कोरोना विषाणू विनाष करणारे UVC सयंत्र ( अमेरिकन संस्था USFDA) तथा WHO.NABL मान्यताप्राप्त संस्था VIMTA Lab द्वारा प्रमाणित UVC स्कॅनर M/s.Srias Engineering Pvt.Ltd. (Manufactures UVC Scanz), हैदराबाद तेलंगनामार्फत बसविण्यात मान्यता देण्यात येत आहे. तसेच वित्तीय खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४९ विषय क्रमांक - ०९

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथम्कि शिक्षण विभागात कायम पर्यवेक्षक वर्ग-३ पदावर सध्या दोन कर्मचारी कार्यरत आहेत. सदर पर्यवेक्षकांकडे महानगरपालिकेच्या तसेच खाजगी अनुदानित, विनाअनुदानित एकूण ६५८ शाळाचे कामकाज नियंत्रणाचे कामकाज आहे. तसेच सर्व आठ विभागातील शाळा तपासणी, गुणवत्ता वाढी, शाळाभेटी, तक्रारीचे निवारण करणे, मार्गदर्शन करणे, मुख्याध्यापक व शिक्षक यांचे सभा व प्रशिक्षण घेणे, खाजगी शाळांना मान्यतेकामी शाळा भेट देणे इ. कारणासाठी प्रतिमहा २०० कि.मी. जास्त फिरती करावी लागत असल्याने महानगरपालिकेच्या इतर विभागातील फिरतीचे पदावरील कर्मचाऱ्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील कार्यरत कायम पर्यवेक्षक वर्ग-३ पदास फिरती भत्ता लागू करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५० विषय क्रमांक - १०

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये शिक्षण विभागात आवश्यक असणारी पर्यवेक्षीय यंत्रणेची पदे कमी प्रमाणात आहेत.त्यामुळे त्यांची सर्व कामे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत असणारे कर्मचारी करत आहेत. सदर कर्मचारी हे तात्पुरत्या मानधनावर काम करत

असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमांच्या शाळांवर पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण विभागाचे प्रभावी नियंत्रण दिसून येत नाही. सदर शाळांची संख्या २९४ असून या शाळांच्या बाबत शिक्षण विभागाकडे सतत फी संदर्भात व इतर अनेक बाबीविषयक तक्रारी प्राप्त होत असतात. सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या पर्यवेक्षकापैकी श्री.विलास पाटील हे या शाळांबाबत कामकाज पाहत आहेत. त्यांच्या बाबतीत पुणे पालक संघ यांनी ते व्यवस्थितरित्या तक्रारींचे निवारण करत असून त्यांची या पदावरून बदली करू नये असे मा.आयुक्त, मनपा, पिंपरी यांना पत्र देण्यात आलेले आहे. श्री.विलास पाटील यांचे इंग्रजी माध्यमातून शिक्षण झालेले असल्याने ते तक्रार निवारण व खाजगी इंगजी माध्यम शाळा आणि पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण विभाग यांच्यात समन्वय साधण्याचे काम योग्यरित्या हाताळत आहेत. त्यामुळे त्यांना खाजगी इंग्रजी माध्यम शाळांवर कायमस्वरूपी पर्यवेक्षक म्हणून नेमण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक - ११

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.तुषार हिंगे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपुर्ण देशामध्ये असलेने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे सद्यस्थितीमध्ये सर्व प्राथमिक शाळा बंद आहेत व शालेय शिक्षण ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत. सदरचे काळामध्ये विद्यार्थींना शालेय साहित्य देता आले नाही तथापि नजीकचे काळामध्ये प्राथमिक शाळा सुरु असल्याचे गृहीत धरुन शालेय विद्यार्थींना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य दफ्तरे, स्पोर्ट शुज, वॉटरबॉटल, कंपासपेटी व लेखनपॅडची आवश्यकता आहे. तसेच मध्यवर्ती भांडार विभागाच्या दिनांक - ०९/०७/२०२१ च्या पत्रानुसार मध्यवर्ती भांडार विभागामार्फत विविध शैक्षणिक साहित्यांचे नमुने व दर नव्याने बाजारामधुन मागणी करणेकामी कार्यवाही करणेत यावेत व प्राप्त साहित्यांचे नमुन्यांची शिक्षण समितीची मंजुरी घेणेकामी कार्यवाही करणेत येवून पुढील निविदा विषयक कार्यवाही प्रस्तावित करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक - १२

दिनांक - २०/०७/२०२१

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.सारिका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

सन २०२१-२२ करिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थीकरिता मोफत शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी प्रक्रिया करत असताना अथवा

कोणतेही परिपत्रक, आदेश पारित करण्यापूर्वी मा.शिक्षण समितीची मान्यता घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३५९/२०२१
दिनांक : २०/०७/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना